चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
३० एप्रिल, २०२०
☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7276494810 (PRO)

# वरोरा पोलीसांनी जप्त केला २ लाखाचा सुगंधीत तंबाखु

## कोविड–१९ च्या पार्श्वभुमिवर महत्वपुर्ण कार्यवाही

दिनांक २९/०४/२०२० रोजी वरोरा पोलीसांना माहिती मिळाली की, शर्मा पान मटेरीयल वरोरा यांचे वरोरा येथील गोडाउन मध्ये प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुचा अवैध साठा आहे. अशी माहिती मिळताच वरोरा पोलीसांनी विजय शर्मा रा. विठ्ठल मंदीर वार्ड वरोरा यांचे घरसदृष गोडाउन मध्ये छापा टाकला असता, पथकास पुढिल प्रमाणे माल मिळुन आला.

- मजा तंबाखु १४३ बॉक्स प्रत्येकी २०० ग्रॅम,
- इगल हुक्का तंबाखु ४० पाउच प्रत्येकी ४० ग्रॅम
- बाबा १२० तंबाखु ६ खरडयाचे बॉक्स २०० ग्रॅम
- इगल हुक्का तंबाखु १० पाउच प्रत्येकी २०० ग्रॅम
- बाबा डिलक्स तंबाखु ३७ पाउच प्रत्येकी ४० ग्रॅम
- जाफरानी तंबाखु १०० लहान पाउच
- रत्नाछाप तंबाखु २५ नग प्रत्येकी ५० ग्रॅम
- मजा तंबाखु ४३ बॉक्स प्रत्येकी ५० ग्रॅम
- रजनिगंधा सुगंधीत मसाला ५८ पाउच असलेले ४५ बॉक्स?
- पान पराग प्रिमीयम पान मसाला प्रत्येकी ३० पाउच असलेले ९१ बॉक्स

त्याचप्रमाणे अंदाजे ६५ किलो कॅरी बॅग असा एकुण २,०८,८२८/–रू चा तंबाखु संबंधीत मुद्देमाल वरोरा पोलीसांनी छापा टाकुन जप्त केला असुन सदर बाबत अन्न व औषध प्रशासनास कार्यवाही बाबत कळविण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. डॉ. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात श्री. यतीश देशमुख(भापोसे) प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन वरोरा यांचे नेतृत्वात सपोनि. चवरे, सपोनि. मडावी, नापोशि. दुधे, पोशि. निषाद, निकोडे, कराडे पोलीस स्टेशन वरोरा यांनी पार पाडली. कोविड १९ च्या पार्श्वभुमिवर नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातुन वरोरा पोलीसांनी केलेली तंबाखु विरोधी कार्यवाही ही अत्यंत महत्वपुर्ण व कौतुकास्पद आहे.

---

चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

३० एप्रिल, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

: 7276494810 (PRO)

# लॉकडाउन दरम्यान चंद्रपुर पोलीसांची कार्यवाही

जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषीत केला असुन कोरोना विषाणुचा प्रसार भारतात, संपुर्ण महाराष्ट्रात गतीने पसरत असल्याने चंद्रपूर जिल्हयात या कोरोना (Covid-19) विषाणु चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (३) अन्वये जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी जमावबंदी आदेश निर्गमित केले आहेत. सर्वत्र लॉकडाउन असतांना नागरीकांनी घराबाहेर पडु नये असे आदेश आहे. आदेशाचे उल्लघंन करणाऱ्या इसमांवर त्याचप्रमाणे इतर आवश्यक महत्वपुर्ण कार्यवाही चंद्रपुर पोलीस करीत आहे. जेनेकरून सर्वत्र शांतता अबाधित राहील व कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही.

दिनांक २९ एप्रिल, २०२० रोजी जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरूध्द भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ अन्वये २० गुन्हे दाखल करण्यात आले आहे. लॉकडाउनच्या काळात आज पावेतो एकुण २९२ केसेस करण्यात आल्या असुन एकुण १०३५ वाहने जप्त व १५,७०,८७०/—रू दंड वसुल करण्यात आला आहे.

तरी, पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी चंद्रपूर जिल्हयातील सर्व नागरीकांना आवाहन केले आहे की, चंद्रपूर जिल्हयात कोरोना (Covid-19) विषाणु चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाद्वारे निर्गमित केलेल्या संचारबंदी आदेशाचे पालन नागरीकांनी काटेकोरपणे करुन स्वत:चे आणि इतरांचे जिव धोक्यात टाकु नये. तसेच पोलीसांना सहकार्य करावे. संचारबंदी आदेशाचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीतांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

———————————————————————————————